# करू मैत्री मराठीशी

## इयत्ता तिसरी

विनामूल्य वितरणासाठी



# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**

**(१४४१६ / १८००-८९-१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६द्वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

# मनोदर्पण

**मनोदर्पण (८४४८४४०६३२)** ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

सदर पाठ्यपुस्तक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार तयार करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत या पाठ्यपुस्तकाची पडताळणी करण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १.०६.२०२६ रोजीच्या सभेमध्ये हे पाठ्यपुस्तक शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**समग्र शिक्षा**

# करू मैत्री मराठीशी

## इयत्ता तिसरी

(हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता)



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

सोबतच्या चौकटीतील Q.R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन केल्यास आपणांस डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक्, श्राव्य आणि दृक्श्राव्य स्वरूपातील अध्ययन–अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२६

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

## मराठी भाषा समिती

**डॉ. संगीता बर्वे, अध्यक्ष**
डॉ. लता घोलप, सदस्य
श्रीमती राधिका पवार, सदस्य
श्रीमती अनुराधा चव्हाण, सदस्य
डॉ. चित्रा गवारे, सदस्य
श्रीमती ज्योती वालझाडे, सदस्य
श्री. नारायण शिंदे, सदस्य
श्री. देविदास गोसावी, सदस्य
डॉ. संतोषकुमार राठोड, सदस्य
डॉ. ज्ञानेश्वर नागरे, अभ्यासक्रम समन्वयक
डॉ. नंदा भोर, अभ्यासक्रम समन्वयक
श्रीमती सविता वायळ, सदस्य सचिव

## गाभा समिती सदस्य

श्री. शेषाद्री डांगे
श्री. अरूण कोल्हटकर
डॉ. आनंद काटीकर

## निमंत्रित तज्ज्ञ

डॉ. विद्या नावडकर, गुणवत्ता परीक्षक
श्रीमती प्रणिता कुलकर्णी, विधी तज्ज्ञ
डॉ. गीतांजली पालकर, CWSN तज्ज्ञ

## संयोजन

**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
**श्री. अशोक बाबुराव तकटे**
सहायक विशेषाधिकारी, मराठी (वि. का.)

## निर्मिती

**श्रीमती मिताली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. संदीप आजगांवकर**
निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**
**श्री. हेमंत बाबर**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

| | | |
|---|---|---|
| **चित्रकार** | : | मयुरा डफळ, विवेकानंद पाटील |
| **मुखपृष्ठ** | : | विवेकानंद पाटील |
| **अक्षरजुळणी** | : | भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| **कागद** | : | ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह |
| **मुद्रणादेश** | : | N/PB/2026-27/Qty. 63 |
| **मुद्रक** | : | M/s Graphic Arts, Mumbai |

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# प्रस्तावना

बाल मित्रमैत्रिणींनो,

तुम्ही या वर्षी इयत्ता तिसरीत आलात. तुमचे मनापासून स्वागत. ‘करू मैत्री मराठीशी’ इयत्ता तिसरी हे मराठीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना खूप आनंद होत आहे.

यापूर्वीच्या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला काही गाणी, गोष्टी व विविध कृती यांद्‌वारे तुम्हांला मराठी भाषेचा परिचय झालेला आहे. या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला चित्रवर्णन, कविता, गोष्टी, चित्रकथा, अक्षरे, स्वरचिन्हे, भाषिक कोडी, भाषिक खेळ व कृती यांसारख्या विविध गोष्टी नव्याने शिकायला मिळणार आहेत. तुमचा भाषा शिक्षणाचा पाया भक्कम होण्यासाठी व तुम्हांला मराठी भाषा चांगल्या रीतीने बोलता, वाचता व लिहिता यावी यादृष्टीने या पाठ्यपुस्तकाची नक्कीच मदत होणार आहे. तुमचे भाषा शिक्षण आनंददायी व रंजक होण्यासाठी या पाठ्यपुस्तकात आशयानुरूप आकर्षक व बोलकी चित्रे देण्यात आलेली आहेत.

या पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तुम्हांला साभिनय व तालासुरात म्हणता येणार आहेत. या कविता म्हणताना तुम्हांला खूप मजा येईल. पाठ्यपुस्तकातील सचित्र असलेल्या वाचन कृती, चित्रकथा, विविध गोष्टी ऐकून व वाचून तुम्हांला धमाल वाटेल. गोष्टी ऐकताना व सांगताना तुम्ही नक्कीच त्यात रमून जाल. पाठ्यपुस्तकातील चित्रे पाहताना तुम्ही त्यातील प्रसंगामध्ये एकरूप होऊन त्यावर भरपूर गप्पा मारून चर्चा कराल.

पाठ्यपुस्तकातील अक्षरगटांची व वाचन कृतींची ज्या पद्‌धतीने रचना केलेली आहे त्यातून तुम्ही हळूहळू अक्षरे व स्वरचिन्हे ओळखणार आहात. सचित्र अशा वाचन कृतींची रचना व मांडणी तुम्हांला नक्कीच आवडेल. अक्षरे शिकताना चित्रांवरून शब्द ओळखणे, शब्दांतील सारखे अक्षर ओळखणे, अक्षर गिरवणे, अक्षरे लिहिणे अशा सरावांतून एकेक अक्षर व स्वरचिन्हे तुम्हांला शिकायची आहेत. अक्षरांची व स्वरचिन्हांची ओळख झाली, की तुम्ही हळूहळू छोटे छोटे शब्द लिहू शकाल आणि त्यानंतर छोट्या छोट्या वाक्यांची रचना करू शकाल. त्याचबरोबर शब्दांचे अनेक खेळही असणार आहेत. सरावातून आणि खेळत खेळत तुम्ही भाषा शिकणार आहात.

पाठ्यपुस्तकातील या सर्व गोष्टींतून तुमची भाषेची ओळख अधिकाधिक पक्की होत जाणार आहे. वर्षाच्या शेवटी तुम्ही मराठी भाषा नक्कीच छान बोलायला, वाचायला आणि लिहायला शिकणार आहात. बाल मित्रमैत्रिणींनो आनंदाने मराठी शिका, यासाठी तुम्हा सर्वांना मनापासून खूप खूप शुभेच्छा!

**(अनुराधा ओक)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक :** १ मे २०२६
**भारतीय सौर :** वैशाख ११, शके १९४८
महाराष्ट्र दिन

## इयत्ता तिसरी
## हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता

| क्रमांक | अध्ययन निष्पत्ती | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१.१ | परिसरातील संवाद लक्षपूर्वक ऐकतो.<br>(अ) विविध प्रसंगानुरुप दिलेल्या सूचना लक्षपूर्वक ऐकतो.<br>(ब) शाळा व परिसरात मराठी भाषेत होणारे संवाद लक्षपूर्वक ऐकतो.<br>(क) विविध प्रसारमाध्यमांवरील मराठी भाषेतील संवाद लक्षपूर्वक ऐकतो. | २, ३, १४, २५, ३६, ३७ |
| १.२.१ | विविध माध्यमातून ऐकलेल्या कथा, कविता, संवाद लक्षपूर्वक ऐकतो.<br>(अ) चित्रमालिकेतील कथा लक्षपूर्वक ऐकतो.<br>(ब) विविध माध्यमांद्वारे मराठी भाषेतील कवितांचे श्रवण करतो. | १, १३, १८, २०, २२, २३, ३१, ३५, ४३, ४८, ४९, ५४, ५९ |
| १.२.२ | ऐकलेल्या कथा, कविता, संवाद मराठी भाषेत सादर करतो.<br>(अ) ऐकलेल्या कथा, कविता यांमधील पात्रांबद्दल माहिती सांगतो.<br>(ब) ऐकलेला संवाद स्वत:च्या शब्दात सांगतो. | १, १३, १८, २०, २२, २३, २५, ३१, ३५, ४३, ४८, ४९, ५४, ५९ |
| १.३.१ | विविध घटना, प्रसंग यावर मित्रांसोबत चर्चा करतो.<br>(अ) विविध प्रकारच्या घटना व प्रसंग मित्रांना सांगतो.<br>(ब) घडलेल्या घटना व प्रसंगांबाबत मित्रांशी चर्चा करतो. | २, ३, १४, २५, ३६, ३७ |
| २.१.१ | दिलेल्या अक्षरांचे ध्वनीसह उच्चारण करतो.<br>(अ) अक्षरांचे ध्वनी ओळखतो.<br>(ब) स्वरचिन्हविरहित अक्षरांचे वाचन करतो. | ४, ८, ९, १०, ११, १२, १५, १६, १७, १९, २६, २७, २८, ३०, ३२, ३९, ४०, ४५, ४६, ५१, ५२, ५६, ६०, ६१, ६२ |
| २.१.२ | विविध शब्दांतील अक्षरांचे वाचन करतो.<br>(अ) चित्रांसह दिलेल्या शब्दांतील अक्षरे ओळखून वाचतो.<br>(ब) परिचित शब्दांतील अक्षरे ओळखतो. | ४, ८, ९, १०, ११, १२, १५, १६, १७, १९, २६, २७, २८, ३०, ३२, ३९, ४०, ४५, ४६, ४७, ५१, ५२, ५६ |
| २.१.३ | शब्दातील अक्षरे, स्वरचिन्हे वाचतो.<br>(अ) शब्दांतील अक्षरे योग्य ध्वनी उच्चारासह वाचतो.<br>(ब) शब्दातील स्वरचिन्हयुक्त अक्षरे ओळखतो व वाचतो. | ८, ९, १०, ११, १२, १५, १६, १७, १९, २१, २८, ३३, ३४, ४०, ४१, ४६, ५७, ६०, ६१, ६२ |
| २.२.१ | जोडाक्षरविरहित दोन अक्षरी शब्दांचे वाचन करतो.<br>(अ) परिचित जोडाक्षरविरहित दोन अक्षरी शब्दांचे वाचन करतो.<br>(ब) अपरिचित जोडाक्षरविरहित दोन अक्षरी शब्दांचे वाचन करतो. | २१, ४२, ४३, ४६, ५३, ६३ |
| २.२.२ | जोडाक्षरविरहित वाक्यांचे वाचन करतो.<br>(अ) दोन-तीन शब्द असलेल्या छोट्या वाक्यांचे वाचन करतो.<br>(ब) जोडाक्षरविरहित तीन-चार शब्द असलेल्या वाक्यांचे वाचन करतो. | १७, २१, २९, ३४, ५०, ५२, ५३, ५८ |
| २.३.१ | अक्षरांच्या ध्वनीमधून स्वर व व्यंजनांचे ध्वनी वेगळे करतो.<br>(अ) स्वर व व्यंजने ओळखतो.<br>(ब) शब्दातील स्वर व व्यंजनांचे ध्वनी वेगळे करतो. | ११, १२, १६, १७, १९, २६, २८, ३३, ४२, ५७, ६० |
| २.३.२ | स्वरचिन्हविरहित व स्वरचिन्हयुक्त शब्दांचे वाचन व लेखन करतो.<br>(अ) स्वर व व्यंजने जोडून शब्द तयार करतो व वाचतो.<br>(ब) स्वरचिन्हविरहित व स्वरचिन्हयुक्त शब्दांचे वाचन व लेखन करतो. | ११, १२, १५, १६, १७, २९, ३४, ४१, ४६, ४७, ५०, ५२, ५३, ५८, ६३, ६४ |
| ३.३.१ | परिसरात बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेतील शब्दांचे अर्थ समजून घेतो.<br>(अ) परिसरात बोलले जाणारे मराठी शब्द ओळखून सांगतो.<br>(ब) चित्रांच्या आधारे मराठी भाषेतील शब्द अर्थासह सांगतो. | १, २, ३, १३, १४, १७, १८, १९, २०, २४, ३०, ३१, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ४१, ४२, ४३, ४४, ४६, ४७, ५०, ५४, ५५, ५९ |
| ३.३.२ | विविध स्त्रोतांद्वारे अपरिचित शब्दांचे अर्थ संदर्भानुसार समजून घेतो.<br>(अ) दृक्‌श्राव्य साधनांद्वारे अपरिचित मराठी शब्द शोधतो.<br>(ब) विविध माध्यमांतून (चित्र, कथा, कविता इ.) मराठी अपरिचित शब्द ओळखून संदर्भाच्या आधारे शब्दांचा अर्थ लावतो. | १, २, ३, १३, १८, २०, २४, ३१, ३५, ३६, ३७, ३८, ४३, ४४, ५४, ५५, ५९, ६३ |
| ३.३.३ | विविध घटना व प्रसंगाच्या मजकुरातील शब्दांचे अनुलेखन व श्रुतलेखन करतो.<br>(अ) विविध घटना/ प्रसंगाच्या मजकुरातील शब्दांचे अनुलेखन करतो.<br>(ब) विविध घटना /प्रसंगांच्या मजकुरातील शब्दांचे श्रुतलेखन करतो. | १४, २९, ३४, ३८, ५०, ५३, ५४, ५५, ५८, ६३ |

- **अध्यापनाद्‌वारे विद्यार्थ्यांकडून वर दिल्याप्रमाणे किमान अध्ययन निष्पत्ती साध्य करून घेणे अनिवार्य आहे. अध्ययन निष्पत्तींच्या समोर दिलेल्या पृष्ठक्रमांकाच्या व्यतिरिक्त इतर पृष्ठक्रमांकांवर दिलेल्या आशयाद्‌वारे देखील इतर अध्ययन निष्पत्ती साध्य होऊ शकतात, असा प्रयत्न शिक्षकांनी करावा.**

# शिक्षक व पालकांसाठी सूचना

हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता नव्याने तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम डोळ्यांसमोर ठेवून 'करू मैत्री मराठीशी' हे अमराठी माध्यमांसाठी पाठ्यपुस्तक तयार करण्यात आलेले आहे. अभ्यासक्रमातील अमराठी माध्यमांसाठी निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्तींचा विचार करून पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आली आहे. वर्गातील विद्यार्थ्यांच्या भाषांचा विचार अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील आंतरक्रियेदरम्यान करणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकामध्ये समाविष्ट करण्यात आलेले पाठ्यघटक आनंददायी, क्रीडायुक्त व अधिकाधिक सरावाच्या कृती यांच्या माध्यमातून घेण्यात यावेत. विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत.

पाठ्यपुस्तकातील आकर्षक व बोलकी चित्रे, लेखन व वाचनपूर्व तयारीच्या कृती, अक्षर ओळख, अक्षरलेखनाचा सराव, अक्षरगट, चित्रकथा, गोष्टी, कविता, शब्दखेळ, भाषिक खेळ, शब्दकोडी यांसारख्या घटकांचे अध्यापन करताना अधिकाधिक उदाहरणे देणे, प्रश्न विचारणे, शैक्षणिक साहित्याचा वापर करणे, विद्यार्थ्यांचा शब्द वाचन व लेखनाचा अधिकाधिक सराव घेणे, विद्यार्थ्यांना भाषण-संभाषणासाठी संधी उपलब्ध करून देणे यांसारख्या गोष्टींवर भर देण्यात यावा. पाठ्यपुस्तकातील पाठ्यघटकांचे अध्यापन करताना विद्यार्थ्यांना गटांमध्ये चर्चा करण्याची व स्वत:चे मत मांडण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

### चित्रगप्पा

- विद्यार्थ्यांना चित्रासंदर्भात निरीक्षण करण्यास सांगावे. चित्र व शब्द यांची ओळख करून द्यावी. चित्र व शब्द यांची ओळख होण्यासाठी विविध उदाहरणांचा वापर करावा.
- विद्यार्थ्यांच्या तार्किक शक्तीचा विकास होण्यासाठी चित्रांतील विविध घटकांवर आधारित उपयोजनात्मक प्रश्न विचारावेत, अभिव्यक्त होण्याच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.
- आशयातील घटनांची दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांशी, प्रत्यक्ष अनुभवांची सांगड चित्रांशी घालून विद्यार्थ्यांमध्ये समस्या निराकरणाची दृष्टी निर्माण करावी.

### कविता

- विद्यार्थ्यांना कविता ऐकवाव्यात व म्हणण्यासाठी प्रोत्साहित करावे.
- कविता म्हणताना विद्यार्थी शब्दांचे योग्य उच्चारण करतो का? याकडे विशेष लक्ष द्यावे.
- विद्यार्थ्यांना वर्गामध्ये कविता तालासुरात व साभिनय सादर करण्यासाठी संधी उपलब्ध करून द्याव्यात. गटनिहाय सादरीकरणात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात यावा.
- तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध कविता ऐकवाव्यात.

### अक्षरगट

- वाचनपूर्व तयारी व लेखनपूर्व तयारीकरिता दिलेल्या कृतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची व लेखनाची ओळख करून द्यावी.
- पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या नऊ अक्षरगटांमधील स्वर, व्यंजने आणि स्वरचिन्हे यांची ओळख, लेखन व सराव या पद्‌धतीने मुळाक्षरांची ओळख करून द्यावी.
- अक्षरगट झाल्यानंतर अक्षरगटावर आधारित अक्षरांचे व परिचित शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.
- विद्यार्थ्यांच्या वाचन, अनुलेखन व श्रुतलेखनाकडे विशेष लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांना वाचन व लेखनात जेथे अडचणी येतील तेथे मार्गदर्शन करावे.

### वाचन कृती

- नऊ अक्षरगटांवर सचित्र स्वरूपात तयार करण्यात आलेले वाचनपाठ हे विद्यार्थ्यांच्या वाचन व लेखनासाठी उपयुक्त आहेत.
- वाचनासाठी दिलेले चित्रमय पाठ, चित्रकथा, गोष्टी यांचे प्रकट वाचन करावे.
- पाठांमधील चित्रांचे निरीक्षण करण्याची संधी द्यावी व त्यावर अधिकाधिक बोलण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करावे.
- शिक्षकांनी स्पष्ट उच्चार, आवाजातील चढउतार, विरामचिन्हे लक्षात घेऊन योग्य हावभावांसहित गोष्टींचे वाचन करून दाखवावे.
- विद्यार्थ्यांचा वयोगट, आवड, भावविश्व लक्षात घेऊन आकर्षक मोठी चित्रे व कमी मजकूर असणारी गोष्टींची पुस्तके निवडावी.

### शब्दखेळ

- शब्दसंपत्ती व भाषिक आनंद यासाठी समाविष्ट करण्यात आलेले शब्दखेळ, शब्दकोडी, शब्दशोध पाटी हे घटक विद्यार्थ्यांकडून कृतियुक्त स्वरूपात करून घ्यावेत व त्यांचा अधिकाधिक सराव घ्यावा.

### मातृभाषा

- अभिव्यक्तीसाठी विद्यार्थ्यांनी मातृभाषेचा किंवा माध्यम भाषेचा उपयोग केल्यास त्याचा स्वीकार करावा. मातृभाषेचा स्वीकार करत असताना विद्यार्थ्यांना मराठी प्रमाण भाषेकडे नेण्याच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून द्याव्यात.

# अनुक्रमणिका


## भाग–१

१. पान (कविता) १
– पद्‌मिनी बिनीवाले
● पाऊस (चित्रवर्णन) २
२. माझी जोडी ४
३. लेखनपूर्व तयारी ५
४. अक्षरगट क्र.१– क म ल अ आ ा ८
५. एक गाव ढगांचे (कविता) १३
– स्वाती लोंढे
६. कृती करू या १४
७. अक्षरगट क्र.२ – घ र ब इ ई ि ी १५

## भाग–२

८. दोस्ती आपली सोडू नका (कविता) १८
– माधवी कुंटे
९. अक्षरगट क्र.३– न स प त उ ऊ ु ू १९
१०. लांडगा आला रे आला (चित्रकथा) २२
११. संवाद २५
१२. अक्षरगट क्र.४– च ळ ह झ ए े २७
१३. भोपळ्याचे पाय (कविता) ३१
– विनय अपसिंगकर
१४. अक्षरगट क्र.५– द ड व ग ऐ ै ३२

## भाग–३

१५. पक्ष्यांची शाळा (कविता) ३५
– कल्याण इनामदार
● आमचे खेळ (चित्रवर्णन) ३६
१६. अक्षरगट क्र.६– ध य फ ज श ओ ो ३९
१७. चिंचेचं झाड (कविता) ४३
– उत्तम कोळगावकर
१८. अक्षरगट क्र.७– ण ख थ भ औ ौ ४५
१९. एकीचे बळ (चित्रकथा) ४८
२०. मजा ५०

## भाग–४

२१. अक्षरगट क्र.८ – ट ढ ठ छ ष ५१
२२. सारे कसे छान! (कविता) ५४
२३. अक्षरगट क्र.९– क्ष ज्ञ ॲ ऑ अं अः ऋ ५६
२४. वाट (कविता) ५९
– शंतनू हिरळकर
२५. मुळाक्षरे ६०
२६. चौदाखडी ६१
२७. आजोबांचे इरले ६३
२८. माझी ओळख ६४


**सूचना :** विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अध्ययन–अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांच्या भाषेचा (साईन लँग्वेज) तसेच अन्य पूरक अध्यापन पद्‌धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्‌धतीने शक्य असेल, त्या पद्‌धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

# १. पान

**भाग–१**

## ऐकू या, म्हणू या, गाऊ या.





पावसाच्या धारा
झराझरा आल्या
धरायला जाता
गळून गेल्या

पायरीवर पडलेली
चिमुकली गार
हाती घेता घेता
वितळली पार

पाणयात सोडलेली
कागदाची होडी
बुडूनच गेली
नाही नावाडी

कुंडीतलं झाड
इवलंसं छान
त्याला मात्र आलं
हिरवं हिरवं पान

– पद्‌मिनी बिनीवाले





**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. विद्यार्थ्यांकडून गार–पार, छान–पान यांसारख्या यमक जुळणाऱ्या शब्दांचा सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांना अपरिचित शब्द व त्याचे अर्थ सांगावेत. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मराठी भाषेतील कविता ऐकवाव्यात. तसेच ऐकलेल्या कवितेवर विविध प्रश्न विचारून बोलते करावे. स्वभाषा स्वीकारावी. स्वभाषा स्वीकारत असताना त्यासाठी असलेले मराठी शब्द सांगावेत.

## • पाऊस (चित्रवर्णन)

चित्र पाहा, निरीक्षण करा व सांगा.





**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना दिलेल्या चित्रांचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांमधील वस्तू, व्यक्ती यांची ओळख करून द्यावी. चित्रातील विविध घटना, प्रसंग यांबाबत मित्रांशी चर्चा घडवून आणावी. चित्रातील व्यक्ती एकमेकांशी काय बोलत असतील ते विचारावे. चित्राविषयी बोलताना विद्यार्थ्यांची स्वभाषा स्वीकारावी. स्वभाषा स्वीकारत असताना त्यासाठीचे मराठी शब्द सांगावेत.

# २. माझी जोडी

चित्रे बघा, ओळखा व नावे सांगा.



- चित्रे बघा, चित्राचे नाव ओळखा व चित्रांखालील नावे पाहा.



| कप | चिमणी | गुलाब | फणस |
| --- | --- | --- | --- |

चित्रे बघा, चित्राचे नाव ओळखा व जोड्या लावा.



| फणस | कप | गुलाब | चिमणी |
| --- | --- | --- | --- |

- सारखी नावे ओळखा, जोड्या लावा व नावे सांगा.

| गुलाब | फणस | चिमणी | कप |
| --- | --- | --- | --- |
| कप | चिमणी | गुलाब | फणस |

**शिक्षकांसाठी :** शिक्षकांनी चित्र व शब्दपट्ट्या यांचा वापर करून वस्तू व नावे यांची ओळख करून द्यावी. उत्तरे स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या मातृभाषेचा स्वीकार करावा. चित्र व शब्दपट्ट्या यांचा वापर करून वस्तू व नावे ओळखण्याचा सराव करून घ्यावा.

# ३. लेखनपूर्व तयारी

## मार्गावरून बोट फिरवा. गिरवा.











**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना दिलेल्या आकारांवरून बोट फिरवण्यास सांगावे. तसेच आकार गिरवण्यास सांगावे. यांसारख्या विविध कृती करून घेऊन विद्यार्थ्यांची वाचनपूर्व व लेखनपूर्व तयारी करून घ्यावी. वरील कृतीप्रमाणे बोटाच्या साहाय्याने आकार गिरवण्याचा सराव करून घ्यावा.

# लेखनपूर्व तयारी

**बघा. गिरवा व काढा.**











**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून पेन्सीलच्या साहाय्याने ठिपके जोडून आकार गिरवून घ्यावेत. वरीलप्रमाणे आकार काढण्याचा सराव करून घ्यावा.



## ठिपके जोडून चित्र पूर्ण करा व रंग भरा.





**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना ठिपक्यांवर पेन्सीलने आकार गिरवण्यास सांगावे. विविध आकार काढण्याचा सराव करून घ्यावा. तसेच वही, पाटी, रांगोळी व धूळपाटी यांच्या साहाय्याने आकार काढण्याचा सराव करून घ्यावा.

## चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

# क



कप



कढई



कपाट



केळी

## ‘क’ आवाज ऐका ‘क’ अक्षर पाहा. ‘क’ अक्षराला ◯ करा.




- ## गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

क

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ‘क’ आवाजाचे शब्द विचारून घ्यावेत. त्यांनी सांगितलेले शब्द फलकावर लिहावेत. त्या शब्दांमधील ‘क’ अक्षराला गोल करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांच्या अक्षरांच्या दृढीकरणासाठी अक्षर हवेत गिरवणे, धूळपाटीवर, रांगोळीवर गिरवणे, मोठ्या अक्षरावर बिया, खडे, खडू इत्यादी ठेवण्याच्या कृती घ्याव्यात. तसेच विविध अध्ययन-अध्यापन साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांना अक्षरांची ओळख करून द्यावी. परिसरातील विविध पाट्यांवरील शब्दांमध्ये असणारी अक्षरे ओळखण्यास सांगावीत. वर्णमालेतील सर्व अक्षरांची ओळख करून देताना या प्रकारच्या विविध कृती करून घ्याव्यात.



चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

# म



मणी



मगर



माठ



मोर



‘म’ आवाज ऐका. ‘म’ अक्षर पाहा. ‘म’ अक्षराला ◯ करा.




- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.




म म म म म म म म

म

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ‘म’ आवाजाचे शब्द विचारून घ्यावेत. त्यांनी सांगितलेले शब्द फलकावर लिहावेत. त्या शब्दांमधील ‘म’ अक्षराला गोल करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांच्या अक्षरांच्या दृढीकरणासाठी अक्षर हवेत गिरवणे, धूळपाटीवर, रांगोळीवर गिरवणे, मोठ्या अक्षरावर बिया, चिंचोके, खडे, मणी, खडू इत्यादी ठेवण्याच्या कृती घ्याव्यात. परिसरातील विविध पाट्यांवरील शब्दांमध्ये असणारी अक्षरे ओळखण्यास सांगावे. शब्दकार्डांचा वापर करावा. वर्णमालेतील सर्व अक्षरांची ओळख करून देताना या प्रकारच्या विविध कृती करून घ्याव्यात.



## चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

**ल**

|  |  |  |  |
|---|---|---|---|
| लसूण | लाडू | लेझीम | लिंबू |



## ‘ल’ आवाज ऐका. ‘ल’ अक्षर पाहा. ‘ल’ अक्षराला ◯ करा.




- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

ल ल ल ल ल ल ल ल ल ल

ल

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘ल’ या ध्वनीची ओळख करून द्यावी. शब्दातील ‘ल’ अक्षर ओळखून त्याला गोल करण्याचा सराव करून घ्यावा. चौकटीत दिलेल्या शब्दांतील प्रारंभिक व अंतिम अक्षर ओळखण्यास सांगावे. अक्षरे ओळखण्यासाठी विविध कृतींचा अधिक सराव करून घ्यावा.

## चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

अ


अननस


अजगर

आ


आई


आवळा

- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

अ अ अ अ अ

आ आ आ आ आ

## 'अ', 'आ' आवाज ऐका. 'अ', 'आ' अक्षरे पाहा. 'अ', 'आ' अक्षरांना ◯ करा.

अक्षर    अमर    अळी    आरसा    आजोबा

## चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

ा

म | ा | म ा → मा → मा







## शब्द वाचा व लिहा.

काम ..................    मामा ..................    काका ..................

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'अ' व 'आ' ध्वनींची ओळख करून द्यावी. 'अ' व 'आ' या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा. तसेच दिलेल्या परिचित शब्दांचे अनुलेखन करून घ्यावे. वरील कृतींचा सराव करून घ्यावा.

ऐका, वाचा व समान अक्षरांच्या जोड्या लावा.

| | |
|---|---|
| क | म |
| म | आ |
| अ | क |
| ल | अ |
| आ | ल |

ऐका, वाचा व लिहा.




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून अक्षरे वाचून घ्यावीत. समान अक्षरांच्या जोड्या लावून घ्यावात. अक्षरे वाचत असताना त्यातील स्वर व व्यंजनांची ओळख करून द्यावी. स्वर व व्यंजने ओळखण्याचा सराव विविध कृतींतून करून घ्यावा. झालेल्या अक्षरगटावरील सर्व जोडाक्षरविरहीत शब्दांचे वाचन करून घ्यावे. स्वरचिन्हयुक्त व स्वरचिन्हविरहीत शब्दांचे लेखन करून घ्यावे.

# ५. एक गाव ढगांचे

## ऐकू या, म्हणू या, गाऊ या.



आकाशात होतं ढगांचं गाव
त्याला नव्हतं कोणतंच नाव

गावातले ढग पांढरे–काळे
करडे–निळे, रंग त्याचे वेगवेगळे

काही होते वाटोळे, काही छोटे–मोठे
माहीत नव्हतं त्यांना, ते चाललेत कोठे

खाली जमीन, वरती अवकाश
गाव तरंगतंय हळू, सावकाश

रडणाऱ्या बाळाला गाव दिसलं
रडणं थांबवून ते खुदकन् हसलं

– स्वाती लोंढे

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. यमक जुळणारे शब्द ओळखण्यास सांगावेत व म्हणून घ्यावेत. विद्यार्थ्यांना अपरिचित शब्दांचे अर्थ सांगावेत. तंत्रज्ञानाच्या मदतीने मराठी भाषेतील विविध कविता ऐकवाव्यात. तसेच विद्यार्थ्यांना ऐकलेल्या कवितेचे नाव सांगण्यास प्रेरित करावे.

# ६. कृती करू या.

## चित्रे बघा, ऐका व म्हणा.



- मैदानावर रांगेत या.
- उंचीनुसार रांगेत उभे राहा.
- राष्ट्रगीत म्हणताना हालचाल करू नका.




- एकमेकांशी बोलू नये.
- पुस्तकांची पाने दुमडू नका.
- पुस्तक वाचून झाल्यावर जागेवर ठेवा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्राच्या खाली दिलेल्या सूचना ऐकवाव्यात. त्या सूचनांचे पालन विद्यार्थी करतात का? याकडे लक्ष द्यावे. अशा प्रकारच्या विविध सूचना तयार करून त्या ऐकवाव्यात. त्यांचा नियमित सराव करून घ्यावा. शालेय ग्रंथालयास भेट द्यावी. शालेय परिपाठ व ग्रंथालयातील प्रसंगाबाबत वर्गातील मित्रांसोबत चर्चा घडवून आणावी.

# ७. घ र ब इ ई ि ी



चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

घ  र  ब 

घर रवी बगळा



'घ', 'र', 'ब' आवाज ऐका. 'घ', 'र', 'ब' अक्षरे पाहा. 'घ', 'र', 'ब' अक्षरांना ☐ करा.




- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

घ घ घ घ घ घ घ

र र र र र र र

ब ब ब ब ब ब ब

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'घ', 'र', 'ब' या ध्वनींची ओळख करून द्यावी. 'घ', 'र', 'ब' या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

इ



इडली



इस्त्री

ई



ईडलिंबू



कढई



‘इ’, ‘ई’ आवाज ऐका. ‘इ’, ‘ई’ अक्षरे पाहा. ‘इ’, ‘ई’ अक्षरांना ☐ करा.




- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

इ

ई

शिक्षकांसाठी : विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘इ’, ‘ई’ या ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘इ’, ‘ई’ या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

## चित्रे बघा. ऐका, म्हणा व वाचा.

ि  ी 

ि म → िम → मि ..... मिरची .....

र ी → र ी → री ..... बकरी .....

## ऐका, म्हणा व ि , ी गिरवा.

.....रिमा.....

.....काकी.....




.....मामी.....

.....बकरी.....

## ऐका, म्हणा व वाचा.



रिमा आली.
कबीर आला.
मामी आली.
काकी आली.
मामी घर बघ.



**शिक्षकांसाठी : :** विद्यार्थ्यांकडून आतापर्यंत शिकवलेल्या सर्व अक्षरांना ‘ ि ’ , ‘ ी ’ ही स्वरचिन्हे जोडून वाचन व लेखनाचा सराव घ्यावा. तसेच ही स्वरचिन्हे जोडून शब्द तयार करण्यास सांगावे. जोडाक्षरविरहीत वाक्यांचे वाचन करून घ्यावे. तसेच वाचन करत असताना बोलले जाणारे मराठी भाषेतील शब्दांचे अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगावेत.

# ८. दोस्ती आपली सोडू नका

## ऐकू या, म्हणू या, गाऊ या.



घुंगर वाजे खुळखुळ–वारा वाहे झुळझुळ
पाने करती सळसळ–झरा नाचे खळखळ

पाऊस पडतो रिमझिम–पैंजण वाजती रुमझुम
भुंगे करती गुणगुण–बांगड्यांची किणकिण

इंजिनाची झुकझुक–शिटी वाजे कुकुकुक
पाखरांचा चिवचिवाट–ढगांचा गडगडाट

आवाज सारे गोड–सांगतात बोला गोड
भांडू नका, तंडू नका–दोस्ती आपली सोडू नका!

– माधवी कुंटे

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. कवितेतील पुनरावृत्ती असणाऱ्या शब्दांची ओळख करून द्यावी. विविध कवितांच्या माध्यमातून पुनरावृत्ती असणारे शब्द ओळखण्यास प्रोत्साहित करावे. तसेच कवितेतील आवडलेले शब्द सांगण्यास प्रेरित करावे.

## चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

न स प त


नळ


समई


पतंग


तबला

'न', 'स', 'प', 'त' आवाज ऐका. 'न', 'स', 'प', 'त' अक्षरे पाहा. 'न', 'स', 'प', 'त' अक्षरांना ○ करा.


नथ


ससा


पान


तराजू

- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

न न न न न न

स स स स स स

प प प प प प प

त त त त त त त

शिक्षकांसाठी : विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'न', 'स', 'प', 'त' या ध्वनींची ओळख करून द्यावी. 'न', 'स', 'प', 'त' या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



## चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.




उशी उंट ऊस पाऊस



## ‘उ’, ‘ऊ’ आवाज ऐका. ‘उ’, ‘ऊ’ अक्षरे पाहा. ‘उ’, ‘ऊ’ अक्षरांना ◯ करा.




- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.







**शिक्षकांसाठी : :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘उ’, ‘ऊ’ या ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘उ’, ‘ऊ’ या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

## ऐका, म्हणा, वाचा व लिहा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ु | कु | कु | कु | मु | मु | ........ |
| | लु | लु | ........ | घु | घु | ........ |

## ऐका, म्हणा, वाचा व लिहा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ू | बू | बू | बू | नू | नू | ........ |
| | सू | सू | ........ | पू | पू | ........ |

## गिरवा व लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| ु | रु | रु | ........ |
| ू | रू | रू | ........ |

- ‘ ु ’ व ‘ ू ’ जोडून शब्द पुन्हा लिहा व वाचा.

पुरी ........ सुका ........ रुमाल ........ पूल ........

## ऐका, म्हणा व वाचा.



ससा बघ.
उमा ससा बघ.
पूनम ससा बघ.
अमन ससा बघ.



**शिक्षकांसाठी :** झालेल्या अक्षरगटांतील अक्षरांचा व स्वरचिन्हांचा उपयोग करून विद्यार्थ्यांकडून विविध शब्द व त्या शब्दांचे वाचन व लेखन करून घ्यावे. परिचित अक्षरांचे व शब्दांचे अनुलेखन करून घ्यावे. विद्यार्थ्यांकडून वाचनपाठाचे वाचन करून घ्यावे.

# १०. लांडगा आला रे आला.

**ऐका. म्हणा व सराव करा.**



एका गावात दिनू नावाचा एक खोडकर मुलगा राहत होता. तो रोज गावाबाहेर मेंढ्या चारायला जायचा. पण त्याला रिकामे बसून खूप कंटाळा यायचा.



एके दिवशी गंमत म्हणून त्याने मोठ्याने ओरडायला सुरुवात केली,
**“लांडगा आला रे आला!**
**लांडगा आला रे आला!”**



गावातील लोक धावत धावत त्याच्या मदतीला आले, पण तिथे लांडगा आलेला नव्हता. दिनू मोठ्याने हसू लागला. गावकऱ्यांना समजले, की तो खोटे बोलत आहे.



काही दिवसांनी दिनूने पुन्हा तीच खोडी केली. पुन्हा एकदा तो ओरडला,
**“लांडगा आला रे आला!”**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील गोष्ट सांगावी. तसेच गोष्ट सांगण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. गोष्टीचे नाट्यीकरण करून घ्यावे. योग्य तेथे मार्गदर्शन करावे. कथेतील पात्रांची नावे सांगण्यास प्रेरित करावे. ऐकलेल्या कथेवर प्रश्न विचारावेत. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध कथा ऐकवाव्यात. तसेच शालेय ग्रंथालयातील छोट्या चित्रकथांची पुस्तके उपलब्ध करून द्यावीत. चित्रकथेतील मजकुरातील शब्दांचे अनुलेखन करून घ्यावे.

गावकरी पुन्हा धावत आले,
पण पुन्हा तिथे लांडगा नव्हता.
गावकरी रागावले आणि
परत गेले.





काही दिवसांनी खरोखरच एक
लांडगा मेंढ्यांच्या कळपाजवळ
आला. दिनू घाबरून जोरात
ओरडू लागला,
**“लांडगा आला रे आला!”**
**“वाचवा! वाचवा!”**

पण गावकऱ्यांना वाटले की
दिनू पुन्हा खोटे बोलत आहे.
त्यामुळे कोणीही मदतीला
आले नाही. लांडग्याने काही
मेंढ्या पळवून नेल्या.





दिनूला आपली चूक समजली.
तो रडू लागला आणि म्हणाला,
“मी कधीही खोटे बोलणार
नाही.”



**कधीही खोटे**
**बोलू नये.**

# माझे पान

तुमच्या आवडीचे चित्र काढा आणि रंगवा. दिलेले चित्र रंगवा.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील प्राणी व पक्ष्यांची नावे विचारावीत. मराठी भाषेत नावे सांगावीत व म्हणून घ्यावीत.

# ११. संवाद

## ऐका, म्हणा व सराव करा.

**राघव :** आरव, तुझ्याकडे पेन आहे का ?
**आरव :** हो, आहे.
**राघव :** मला पेन देतोस का ?
**आरव :** हो. घे.
**राघव :** धन्यवाद आरव!





**मिहीर :** नमस्कार बाई, मला गोष्टीचे पुस्तक मिळेल का ?
**बाई :** तुला कोणते पुस्तक हवे आहे ?
**मिहीर :** मला प्राण्यांच्या गोष्टी आवडतात.
**बाई :** हे पुस्तक वाच. यातील गोष्टी तुला आवडतील.
**मिहीर :** धन्यवाद बाई!

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील संवाद ऐकवावेत व म्हणून घ्यावेत. यांसारखे शाळा, वर्ग व परिसराशी संबंधित अनेक छोटे छोटे संवाद ध्वनिचित्रफितीमार्फत ऐकवावेत व वर्गात त्याचे सादरीकरण करून घ्यावे. ऐकलेल्या संवादावर आधारित प्रश्न विचारावेत. ऐकलेल्या संवादातील आवडलेल्या भागाविषयी गटात चर्चा करण्यास सांगावे. आवडलेला संवाद मराठी भाषेत सादर करण्यास प्रेरित करावे.



## चित्रे व अक्षरे बघा, ऐका. म्हणा, वाचा व समान अक्षरे रेघेने जोडा.



न



स



प



त



उ



ऊ

जसे–

| | | |
|---|---|---|
| नथ | सनई | पान |
| सई | वासरू | बस |
| पक्षी | कपाट | कप |
| तबला | वात | रतन |
| उडी | उशी | उंदीर |
| नऊ | पाऊस | खाऊ |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून समान अक्षरे रेघेने जोडून घ्यावीत. यांसारख्या अक्षरध्वनी ओळखण्याचा सराव विविध कृतींतून करून घ्यावा. तसेच स्वर व व्यंजनाची ओळख विविध कृतींतून करून द्यावी.



चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

**च**



चमचा

**ळ**



माळ

**ह**



हरिण



'च', 'ळ', 'ह' आवाज ऐका. 'च', 'ळ', 'ह' अक्षरे पाहा. 'च', 'ळ', 'ह' अक्षरांना ◯ करा.




- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

च च च च च च च च च च च च

ळ ळ ळ ळ ळ ळ ळ ळ ळ ळ ळ

ह ह ह ह ह ह ह ह ह ह ह ह

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'च', 'ळ', 'ह' या ध्वनींची ओळख करून द्यावी. 'च', 'ळ', 'ह' या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



## चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

झ



झाड



झोपडी



झोका

- गिरवा, लिहा व म्हणा.

झ



## 'ए' आवाज ऐका. 'ए' अक्षर पाहा. 'ए' अक्षराला ◯ करा.

ए



ए डका

९

एक



े

प

| | | | |
|---|---|---|---|
| प | प | पे | पेरू |

- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

ए



## ' े ' जोडून लिहा व वाचा.

जसे – क | के

म ...... ल ...... घ ...... र ...... ब ...... न ......

स ...... प ...... त ...... च ...... ळ ...... ह ...... झ ......

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'झ', 'ए' या ध्वनींची ओळख करून द्यावी. 'झ', 'ए' या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांना ' े ' या स्वरचिन्हाचा परिचय करून द्यावा. अक्षरांना ' े ' हे स्वरचिन्ह जोडून लेखनाचा सराव घ्यावा. विद्यार्थ्यांकडून परिचित अक्षरांचे व शब्दांचे अनुलेखन करून घ्यावे.

## चित्रे बघा, शब्द वाचा व लिहा.



पेरू



केळी



मासे



लेझीम

## अक्षरे वाचा व त्या अक्षरांचे शब्द लिहा.

**ल**

**प**

**च**

## अक्षरे जुळवून योग्य शब्द तयार करा व लिहा.

जसे – **ला ब त – तबला**

**री ब क** ..................................

## ऐका, म्हणा व वाचा.

**हेमा सरबत कर.**
**चेतन सरबत पी.**
**नेहा सरबत पी.**



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून अक्षरांचे शब्द लिहून घ्यावेत. शब्दांचे अनुलेखन करून घ्यावे. अक्षरे जुळवून योग्य शब्द तयार करण्याचा सराव करून घ्यावा. वाचनपाठाचे वाचन करून घ्यावे.



## अक्षरे ओळखा.

- ‘क’ अक्षर ओळखा व गोल करा.



कढई



माकड



बाक

- ‘म’ अक्षर ओळखा व गोल करा.



मका



समई



मगर

- ‘स’ अक्षर ओळखा व गोल करा.



सनई



आरसा



सायकल

- ‘घ’ अक्षर ओळखा व गोल करा.



घर



वाघ




घड्याळ

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्र पाहून चित्राचे नाव ओळखण्यास सांगावे. सूचनेत दिलेली अक्षरे शोधून गोल करण्यास सांगावे. झालेल्या अक्षरगटातील सर्व अक्षरे ओळखण्याचा सराव विविध कृतींतून करून घ्यावा.

# १३. भोपळ्याचे पाय



## ऐकू या, म्हणू या, गाऊ या.





एक भोपळा
लोंबता लोंबता
भलत्यासलत्या
मारायचा बाता

म्हणाला अश्शी
घेईन उडी
एका ढांगेत
चढेन माडी





एवढ्यात तेथे
आली आजी
म्हणाली याची
करावी भाजी

भोपळा म्हणाला
करावं काय ?
माणसांसारखे
नाहीत ना पाय !

– विनय अपसिंगकर

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. कवितेतील यमक शब्द ओळखण्यास सांगावे. विविध कवितांच्या माध्यमातून यमक ओळखण्यास प्रोत्साहित करावे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध कविता ऐकवाव्यात.

# १४. द ड व ग ऐ ै

चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

द ड व ग



दरवाजा



डमरू



वड



गवत

शब्दांतील 'द', 'ड', 'व', 'ग' अक्षरे पाहा. गोलातील अक्षरांना जोडा.




- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

द द द द द द द

ड ड ड ड ड ड

व व व व व व

ग ग ग ग ग ग

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'द', 'ड', 'व', 'ग' या ध्वनींची ओळख करून द्यावी. 'द', 'ड', 'व', 'ग' या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



‘ऐ’ आवाज ऐका. ‘ऐ’ अक्षरे पाहा. ‘ऐ’ अक्षराला ◯ करा.

ऐ



ऐक



ऐरण



ै

क

ै क कै कै कैरी

- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

ऐ ऐ ऐ ऐ ऐ ऐ ऐ ऐ ऐ ऐ

ऐ



‘ ै ’जोडून लिहा व वाचा.

जसे – क | कै

म मै ल ........ घ ........ र ........ ब ........ न ........ स ........ प ........ त ........

च ........ ळ ........ ह ........ झ ........ द ........ ड ........ व ........ ग ........

- दिलेली अक्षरे योग्य चौकटीत लिहा व वाचा.

अ घ इ र उ न ए ब ई स च ऊ प ह ऐ ळ आ

| स्वर | व्यंजन |
|---|---|
| ............ ............ ............ ............ | ............ ............ ............ ............ |
| ............ ............ ............ ............ | ............ ............ ............ ............ |
| ............ ............ ............ ............ | ............ ............ ............ ............ |
| ............ ............ ............ ............ | ............ ............ ............ ............ |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘ऐ’ या ध्वनीची ओळख करून द्यावी व ‘ऐ’ या अक्षराच्या लेखनाचा सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांना ‘ ै’ या स्वरचिन्हाचा परिचय करून द्यावा. अक्षरांना स्वरचिन्हे जोडून सराव घ्यावा. स्वर व व्यंजने ओळखण्याचा सराव विविध कृतींतून करून घ्यावा.



## चौकोनातील अक्षरे बघा. दिलेल्या चित्रांसाठी शब्द तयार करा, लिहा व वाचा.



गुलाब



....................

....................



....................

....................



....................

....................






....................

....................



....................

....................



....................

....................



....................

....................



## ऐका, म्हणा व वाचा.

कैलास बागेत चल.
झाडे लावू.
सावलीत बसू.
पेरू कापू.
आराम करू.



**शिक्षकांसाठी :** चौकोनातील अक्षरे वापरून शब्द तयार करून घ्यावेत. विद्यार्थ्यांकडून वाचनपाठाचे वाचन करून घ्यावे. साधे शब्द तयार करण्यासाठी अक्षरध्वनी जोडून शब्द तयार करण्याचा सराव घ्यावा. मजकुरातील शब्दांचे अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे.

# १५.पक्ष्यांची शाळा

ऐकू या, म्हणू या, गाऊ या.

रानात भरली, पक्ष्यांची शाळा
तिथं फुलला, सुरांचा मळा

पक्ष्यांच्या शाळेत, संगीताचा तास
मोरांच्या नृत्याचं, आकर्षण खास

कोकिळेनं घेतली, गाताना तान
सारेच डोलले, वळवून मान

पोपटाचा तबला, चांगलाच रंगला
मोराचा पिसारा, अधिकच फुलला

साळुंकीनं दिली, कोकिळेला साथ
कावळाही कावऽऽकाव, राहिला गात

कावळ्याच्या गाण्यानं, सारेच चिडले
पंख पसरून, हवेत उडाले

– कल्याण इनामदार




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. यमक जुळणारे शब्द ओळखण्यास व लिहिण्यास सांगावेत. जसे, शाळा-मळा, तान-मान, आली-गेली. अपरिचित शब्दांचे मराठी भाषेत अर्थ समजावून सांगावेत. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध कविता ऐकवाव्यात.

## • आमचे खेळ (चित्रवर्णन)

चित्र पाहा, निरीक्षण करा व सांगा.





**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना दिलेल्या चित्राचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांमध्ये आलेल्या विविध वस्तू, परिसर व खेळांची ओळख करून द्यावी. चित्रावर आधारित विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारावेत. वर्गात चर्चा घडवून आणावी. चित्राच्या आधारे मराठी शब्द विचारावेत. तसेच विविध चित्रे दाखवून अधिकाधिक सराव करून घ्यावा. चित्रातील मुले एकमेकांशी काय काय बोलत असतील ते विचारावे. स्वभाषा स्वीकारावी. स्वभाषा स्वीकारत असताना त्यासाठीचे मराठी शब्द सांगावेत.

# माझे खेळ

चित्रे बघा, ऐका, म्हणा व सराव करा.



दोरी उडी



लंगडी



आंधळी कोशिंबीर



फुगडी




खो – खो



कबड्डी

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. विविध खेळांची नावे वाचून दाखवावीत व म्हणून घ्यावीत. विविध प्रकारचे खेळ मित्रांबरोबर खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. मराठी भाषेतील खेळांची नावे विद्यार्थ्यांना सांगावीत. शब्दांचे अनुलेखन वहीत करून घ्यावे.

# १६. ध य फ ज श ओ ो



चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

ध  य  फ 

धरण यान फळा



‘ध’, ‘य’, ‘फ’ आवाज ऐका. ‘ध’, ‘य’, ‘फ’ अक्षरे पाहा. ‘ध’, ‘य’, ‘फ’अक्षरांना ☐ करा.




- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

ध ध ध ध ध ध ध

य य य य य य य

फ फ फ फ फ फ फ

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘ध’, ‘य’, ‘फ’ या ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘ध’, ‘य’, ‘फ’ या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



## चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

ज  श  ओ 

जहाज | शेत | ओढणी



‘ज’, ‘श’, ‘ओ’ आवाज ऐका. ‘ज’, ‘श’, ‘ओ’ अक्षरे पाहा. ‘ज’, ‘श’, ‘ओ’ अक्षरांखाली ___ मारा.


जांभूळ


बशी


ओढा

- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

ज ज ज ज ज ज ज

श श श श श श श

ओ ओ ओ ओ ओ ओ



‘ओ’ अक्षर शोधा. ‘ओ’ अक्षराखाली रेघ (___) मारा.

चे ओ गे ओ के मे ओ

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘ज’, ‘श’, ‘ओ’ या ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘ज’, ‘श’, ‘ओ’ या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

## ठिपके दिलेले ' ो ' स्वरचिन्ह गिरवा व शब्द वाचा.






म ो र



ढ ो ल

## ' ो ' जोडून लिहा व वाचा.

जसे – क | को

म मो ल ........ घ ........ र ........ ब ........ न ........ स ........ प ........ त ........ च ........ ळ ........

ह ........ झ ........ द ........ ड ........ व ........ ग ........ ध ........ य ........ फ ........ ज ........ श ........

## चित्र ओळखा. शब्द पूर्ण करा.



.......हाज



गा.......



.......क



.......सा



झो.......



ऊ.......

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना ' ो ' या स्वरचिन्हाचा परिचय करून द्यावा. परिचित अक्षरांचे व शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे. शब्दांतील प्रारंभिक व अंतिम अक्षर ओळखून शब्द पूर्ण करण्यास सांगावे. वरील कृतींचा सराव करून घ्यावा.

## शब्द वाचा. ‘ो’ असणारे शब्द शोधा व गोल करा.



| | | |
|---|---|---|
| केळी | वारा | पोळी |
| कान | सूप | दोरा |
| डोळे | कैरी | गुलाब |
| कोकम | चकली | मोगरा |

## ऐका, म्हणा, वाचा व चित्रासाठीचा शब्द चौकटीत लिहा.

(१) हा  आहे. ..........................

(२) ही  आहे. ..........................

(३) हे  आहे. ..........................

(४) हा  आहे. ..........................

**शिक्षकांसाठी :** चित्रासाठीचा शब्द चौकटीत लिहून घ्यावा. विद्यार्थ्यांना वाक्य वाचून दाखवावे व मागे म्हणण्यास सांगावे. वरील कृतींचा अधिक सराव करून घ्यावा.

# १७. चिंचेचं झाड

ऐकू या, म्हणू या, गाऊ या.

अंगणात लावलं
चिंचेचं झाड
भरभर झाली
झाडाची वाढ

झाड झालं
डेरेदार
इवली पानं
हिरवीगार

झाडाला आले
चिंचांचे आकडे
विळ्यासारखे
मोठाले वाकडे

एक दगड
मारला जोरात
चिंचा पडल्या
आमच्या दारात

– उत्तम कोळगावकर



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. यमक जुळणारे शब्द ओळखण्यास सांगावेत. जसे, आकडे-वाकडे. यमक जुळणारे शब्द ओळखून म्हणण्याचा व लिहिण्याचा सराव करून घ्यावा. तसेच कवितेतील जोडाक्षरविरहित शब्दांचे अनुलेखन करून घ्यावे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध कविता ऐकवाव्यात.

चित्रे बघा, झाडापासून मिळणाऱ्या गोष्टींना ◯ करा.



- वेगवेगळ्या झाडांच्या पानांची चित्रे काढा व रंगवा.

१८. ण ख थ भ औ ौ



चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

ण



पणती

ख



खडू

थ



थवा



'ण', 'ख', 'थ' आवाज ऐका. 'ण', 'ख', 'थ' अक्षरे पाहा. 'ण', 'ख', 'थ' अक्षरांखाली ___ मारा.




- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

ण ण ण ण ण ण ण ण ण ण

ण

ख ख ख ख ख ख ख ख ख ख

ख

थ थ थ थ थ थ थ थ थ थ

थ

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील 'ण', 'ख', 'थ' या ध्वनींची ओळख करून द्यावी. 'ण', 'ख', 'थ' या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.



‘भ’, ‘औ’ आवाज ऐका. ‘भ’, ‘औ’ अक्षरे पाहा. ‘भ’, ‘औ’ अक्षरांखाली ___ मारा.






भाकरी






औत

• गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

भ भ भ भ भ भ भ भ भ भ

भ

औ औ औ औ औ औ औ औ

औ



‘औ’ अक्षर शोधा. ‘औ’ अक्षराखाली रेघ (___) मारा.

औ बे औ ने औ पे औ



चित्र बघा. शब्द लिहा व वाचा.









**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘भ’, ‘औ’ या ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘भ’, ‘औ’ या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा. शिकलेल्या अक्षरांचे व शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.

## ठिपके दिलेले ' ौ ' स्वरचिन्ह गिरवा व शब्द वाचा.

ौ





दौत        औषध

## 'ौ' जोडून लिहा व वाचा.

जसे – क | कौ

म ौ ल ...... घ ...... र ...... ब ...... न ...... स ...... प ...... त ...... च ...... ळ ...... ह ...... झ ......

द ...... ड ...... व ...... ग ...... ध ...... य ...... फ ...... ज ...... श ...... ण ...... ख ...... थ ...... भ ......

## दिलेले चित्र व त्याचे पहिले अक्षर यांच्या योग्य जोड्या लावा.





य

थ

घ





भ

च



झ



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना 'ौ' या स्वरचिन्हाचा परिचय करून द्यावा. झालेल्या अक्षरांना स्वरचिन्ह जोडून लेखनाचा सराव करून घ्यावा.

# १९. एकीचे बळ

ऐका. म्हणा व सराव करा.



एक शेतकरी होता. त्याला चार मुले होती. ती नेहमी एकमेकांशी भांडायची. त्यामुळे शेतकऱ्याला त्यांची फार काळजी वाटायची. मुलांनी भांडू नये म्हणून शेतकरी नेहमी त्यांना उपदेश करत असे, पण मुले त्याचे काही ऐकत नसत.

एकदा शेतकऱ्याला एक छान युक्ती सुचली. त्याने चार काठ्या आणल्या आणि त्या एकत्र बांधल्या. मग तो मुलांना म्हणाला, ''हा काठ्यांचा जुडगा तुमच्यापैकी कोणी मोडू शकेल का?''





प्रत्येक मुलाने तो जुडगा मोडण्याचा प्रयत्न केला, पण कोणालाही ते जमले नाही. सगळे एकमेकांकडे पाहू लागले.



मग शेतकऱ्याने काठ्यांचा जुडगा सोडला. प्रत्येकाला एक-एक काठी दिली. शेतकरी म्हणाला,
''आता तुमच्या हातात एक-एक काठी आहे. ती मोडा पाहू.''

लगेच प्रत्येकाने सहजपणे आपापल्या हातातील काठी मोडली. मोठा मुलगा म्हणाला,
''बाबा एकीचे बळ मोठे असते. हे आम्हांला आज कळले. आम्ही सर्व भाऊ यापुढे एकजुटीने राहू.'' हे ऐकून शेतकऱ्याला फार आनंद झाला.







**''एकीचे बळ मिळते फळ.''**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रात घडणाऱ्या घटनांवर चर्चा करावी. चित्रातील गोष्ट सांगावी. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध गोष्टी ऐकवाव्यात. गोष्ट सांगण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. योग्य तेथे मार्गदर्शन करावे.

# २०. मजा

## ऐका. म्हणा व सराव करा.

अमित आईसोबत तलाव पाहायला गेला. तलाव पाहायला खूप लोक आले होते. तलावातील पाणी नितळ होते. तलावात मासे, कासव, खेकडे, बेडूक होते. बाजूला बाग होती. बागेत फुलपाखरे उडत होती. तलावाशेजारी मोठे झाड होते. झाडावर पक्षी आणि खारूताई होती. अमितला तलाव बघताना खूप मजा आली.

## चित्र व शब्द यांच्या जोड्या जुळवा.











मासा

खार झाड

बेडूक कासव खेकडा

तलाव फुलपाखरू

**शिक्षकांसाठी :** पाठाचे प्रकट वाचन करून दाखवावे. प्रत्येक ओळ मागे म्हणून घ्यावी. पाठात आलेले चित्र व शब्द ओळखून वाचन करण्यास सांगावे. चित्र व शब्दांच्या जोड्या लावून घ्याव्यात. पाठातील वाक्यांचे व शब्दांचे अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे.

# २१. ट ढ ठ छ ष

भाग–४

‘ट’, ‘ढ’, ‘ठ’ आवाज ऐका. ‘ट’, ‘ढ’, ‘ठ’ अक्षरे पाहा. ‘ट’, ‘ढ’, ‘ठ’ अक्षरांना ◯ करा.

ट



टरबूज

ढ



ढग

ठ



ठसा

- म्हणा व लिहा.

ट ट ट ट ट ट ट ट ट ट

ढ ढ ढ ढ ढ ढ ढ ढ ढ ढ

ठ ठ ठ ठ ठ ठ ठ ठ ठ ठ

वाचा व लिहा.



टाळ

.....................

.....................



कढई

.....................

.....................



ठोकळा

.....................

.....................



टोपली

.....................

.....................

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘ट’, ‘ढ’, ‘ठ’ या ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘ट’, ‘ढ’, ‘ठ’ या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

‘छ’, ‘ष’ आवाज ऐका. ‘छ’, ‘ष’ अक्षरे पाहा. ‘छ’, ‘ष’अक्षरांना ◯ करा.

छ



छत्री

ष



षट्कोन

- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

छ छ छ छ छ छ छ छ छ छ

छ

ष ष ष ष ष ष ष ष ष ष ष

ष

शब्द ऐका. म्हणा. वाचा व वाक्ये तयार करा.

| | | | |
|---|---|---|---|
| आई | राधा | गाजर | बाबा |
| सई | मदन | पपई | काका |
| ताई | सुमन | पेरू | मामा |
| या | गा | खा | हसा |

उदा., गाजर खा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘छ’, ‘ष’ या ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘छ’, ‘ष’ या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांकडून दिलेले शब्द वापरून वाक्ये तयार करण्याचा सराव करून घ्यावा.

## चित्रांच्या जागी योग्य शब्द वापरून वाक्ये म्हणा.

हे  आहे. झाडावर ,  व  असे बरेच पक्षी येतात. झाडावर  आहे. झाडाला खूप  आहेत. झाडाला एक  बांधला आहे.  खाली खेळायला खूप मजा येते.

## गोलातील शब्द वाचा. पतंगावर दिलेल्या अक्षरांचे शब्द गोलात शोधा, लिहा व वाचा.

जसे–

रेघ
घार
**घ**




.................... **च**

.................... **ठ**

.................... **ढ**

.................... **क**

.................... **ष**

**शिक्षकांसाठी : :** वाक्यातील चित्रांच्या जागी योग्य शब्द वापरून मागे वाक्य म्हणून घ्यावे. गोलातील शब्दांचे वाचन करून घ्यावे. पतंगात दिलेल्या अक्षरांच्या शब्दांचे वाचन व लेखन करून घ्यावे. दिलेल्या मजकुरातील शब्दांचे अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे.

# २२. सारे कसे छान!

**ऐकू या, म्हणू या, गाऊ या.**



गावाजवळ नदी
नदीत पाणी
पाण्यात मासा
झोपतो कसा ?



झोपडीजवळ झाड
झाडावर पक्षी
पक्ष्याच्या पंखांवर
छानछान नक्षी

झाडाजवळ शाळा
शाळेत मुले
बागेत जशी
डोलतात फुले



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. तालासुरात साभिनय म्हणून घ्यावी. कवितेतील अपरिचित शब्द व यमक जुळणारे शब्द विचारावेत. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध कविता ऐकवाव्यात. यमक शब्दांचे अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे. कवितेत आलेले अपरिचित शब्दांचे अर्थ सांगावेत व म्हणून घ्यावेत.

## चित्राचे निरीक्षण करा. नावे सांगा.




## चित्र बघा. चित्रातील वर्गासंबंधीचे शब्द लिहा.

जसे – खिडकी ........................ ........................ ........................ ........................

........................ ........................ ........................ ........................

........................ ........................ ........................ ........................

........................ ........................ ........................ ........................

**शिक्षकांसाठी :** सभोवताली आढळणारे दृश्य शब्द, वस्तूंची नावे याविषयी माहिती सांगावी. विद्यार्थ्यांना चित्राशी संबंधित शब्द विचारावेत व लिहून घ्यावेत. चित्रामध्ये दर्शविलेल्या शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.

# २३. क्ष ज्ञ ॲ ऑ अं अः ऋ

चित्रे बघा, ऐका, म्हणा व वाचा.

क्ष



शिक्षक

ज्ञ



विज्ञान

‘क्ष’, ‘ज्ञ’ आवाज ऐका. ‘क्ष’, ‘ज्ञ’ अक्षरे पाहा. ‘क्ष’, ‘ज्ञ’ अक्षरांना ◯ करा.





पक्षी ज्ञानदा

आज्ञा



रिक्षा

- गिरवा, लिहा, म्हणा व वाचा.

क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष क्ष

ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ ज्ञ

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध शब्दांमधील ‘क्ष’, ‘ज्ञ’ या ध्वनींची ओळख करून द्यावी. ‘क्ष’, ‘ज्ञ’ या अक्षरांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

गिरवा, लिहा, ऐका, म्हणा व वाचा. सारखे उच्चार असलेले अक्षर रेषेने जोडा.

ॲ ॲ ॲ

ॲना बॅग कॅरम कॅमेरा

ऑ ऑ ऑ

ऑगस्ट कॉलेज कॉलर शॉवर

अं अं अं

अंतर अंधार अंबर अंश

अः अः अः

स्वत: शतश: उष:काल अंशत:

ऋ ऋ ऋ

ऋषी ऋत्विक ऋतुजा ऋचा

आवाज ऐका, अक्षर बघा व म्हणा.

| ऌ | ङ | ञ |
|---|---|---|

**शिक्षकांसाठी :** परिचित अक्षरांवर ‘ं’ चे (अनुस्वाराचे) चिन्ह जोडून वाचण्याचा सराव घ्यावा. अनुनासिकाप्रमाणे उच्चार करून दाखवावेत व उच्चार करून घ्यावेत. या इयत्तेमध्ये ‘ऋ’, ‘ऌ’ या स्वरांची आणि ‘ङ’, ‘ञ’ या व्यंजनांची तोंडओळख करून द्यावी.

# शब्दशोध पाटी



## शोधा व लिहा.





| | | | | |
|---|---|---|---|---|
| कॅ | र | म | क | घ |
| न | ता | ग | लिं | म |
| ता | ळे | र | ग | घ |
| भा | क | री | ड | म |
| प | प | ई | घ | र |











जसे– मगर



## ऐका, म्हणा व वाचा.

अॅना बागेत गेली. टॉम बॅट घेऊन आला. मीना बॉल घेऊन आली. टॉम बॅट घेऊन उभा राहिला. अॅनाने बॉल टाकला. टॉमने बॅटने बॉल मारला. मीनाने बॉल पकडला.



**शिक्षकांसाठी :** साधे शब्द तयार करण्यासाठी अक्षरध्वनी जोडून शब्द तयार करून घ्यावे. अशा प्रकारच्या विविध कृतींतून शब्दलेखनाचा सराव करून घ्यावा. वाचनपाठाचे वाचन करून घ्यावे. मजकुरात आलेल्या शब्दांचे अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे.

# २४. वाट

**ऐकू या, म्हणू या, गाऊ या.**

आटपाट
आजोळची वाट
वाटेवर झाडे
आंब्याची दाट

आंब्याची गोडी
माणसांच्या तोंडी
गोडगुलाबी
पाखरांच्या गोष्टी

पाखरांच्या कानी
झुळझुळ वाणी
वारा गातो
झऱ्यांची गाणी

वाऱ्याची शीळ
उन्हाळ्याचा थाट
पानांवर मोहोर
सुट्टीची वाट

– शंतनू हिरळकर



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. कवितेतील अपरिचित शब्द अधोरेखित करून घ्यावे. अपरिचित शब्दांचे अर्थ सांगावेत. शब्द म्हणून घ्यावेत.

# २५. मुळाक्षरे

ऐका, म्हणा व वाचा.



अ आ इ ई उ ऊ ऋ ऌ

ए ॲ ऐ ओ ऑ औ अं अः

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व श

ष स ह ळ क्ष ज्ञ

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून मुळाक्षरांचे मोठ्या आवाजात वाचन व लेखन करून घ्यावे. अक्षरे उच्चारण्याचा अधिकाधिक सराव करून घ्यावा. अक्षरे ऐकून स्वर व व्यंजने ओळखण्याचा अधिकाधिक सराव घ्यावा.



वाचा व लिहा.

# २६. चौदाखडी

| | ा | ि | ी | ु | ू | े | ॅ | ै | ो | ॉ | ौ | ं | ः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | के | कॅ | कै | को | कॉ | कौ | कं | कः |
| ख | | | | | | | | | | | | | |
| ग | | | | | | | | | | | | | |
| घ | | | | | | | | | | | | | |
| च | | | | | | | | | | | | | |
| छ | | | | | | | | | | | | | |
| ज | | | | | | | | | | | | | |
| झ | | | | | | | | | | | | | |
| ट | | | | | | | | | | | | | |
| ठ | | | | | | | | | | | | | |
| ड | | | | | | | | | | | | | |
| ढ | | | | | | | | | | | | | |
| ण | | | | | | | | | | | | | |
| त | | | | | | | | | | | | | |
| थ | | | | | | | | | | | | | |
| द | | | | | | | | | | | | | |
| ध | | | | | | | | | | | | | |

| | ा | ि | ी | ु | ू | े | ॅ | ै | ो | ॉ | ौ | ं | ः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| न | | | | | | | | | | | | | |
| प | | | | | | | | | | | | | |
| फ | | | | | | | | | | | | | |
| ब | | | | | | | | | | | | | |
| भ | | | | | | | | | | | | | |
| म | | | | | | | | | | | | | |
| य | | | | | | | | | | | | | |
| र | | | | | | | | | | | | | |
| ल | | | | | | | | | | | | | |
| व | | | | | | | | | | | | | |
| श | | | | | | | | | | | | | |
| ष | | | | | | | | | | | | | |
| स | | | | | | | | | | | | | |
| ह | | | | | | | | | | | | | |
| ळ | | | | | | | | | | | | | |
| क्ष | | | | | | | | | | | | | |
| ज्ञ | | | | | | | | | | | | | |

# २७. आजोबांचे इरले

## चित्र बघा, ऐका व म्हणा. लक्षात ठेवा व सांगा.

सारा आणि मीना दोघी  जात असताना अचानक आकाशात  जमा झाले. जोराचा वारा सुटला. सरसर  पडू लागला. शाळेत कसे जाणार? एका  आजोबा बाहेर आले. आजोबांनी दोघींना  दिले. इरले घेऊन शाळेत जाणार याचा दोघींना आनंद झाला. साराने  आभार मानले.

- खाली दिलेले शब्द पाहून लिहा.

| | | |
|---|---|---|
| शाळा | ढग | घर |
| ........ | ........ | ........ |
| इरले | आजोबा | पाऊस |
| ........ | ........ | ........ |

- वर दिलेल्या मजकुरातील शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. पाठ वाचून दाखवावा. मागे म्हणून घ्यावा. पाठात आलेले चित्र व शब्द ओळखून वाचन करण्यास सांगावे. शब्दांचे वाचन व लेखन करून घ्यावे. मजकुरातील शब्दांचे अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे.

# २८. माझी ओळख

वाचा व लिहा.

**माझे नाव**

............................................
............................................
............................................
............................................

**माझे वय**

**माझा वाढदिवस**

..................
..................
..................

**माझे गाव**

.......................
.......................
.......................

**माझे मित्र**

............................................
............................................
............................................

**माझे आवडते फूल**

............................................
............................................
............................................
........ ........

**माझी आवड**

............................................
............................................
............................................

**माझा आवडता**

..............................
..............................
..............................

खेळ

..................
..................
..................

रंग

..................
..................
..................

प्राणी

..................
..................
..................

पक्षी

..................
..................
..................

शिक्षकांसाठी : विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे मित्र, स्वत:ची माहिती, रंग, पक्षी आणि खेळ यांचे लेखन करण्यास मदत करावी.

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई–बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला **'वाईट'** वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.




हे बटण दाबा.

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.




चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.

नए समाज की ओर
Towards a new dawn

- विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

करू मैत्री मराठीशी, इयत्ता तिसरी

(हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता)

समग्र शिक्षा
Samagra Shiksha

(विनामूल्य वितरणासाठी)